# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.04.2025** **वार-रविवार**

---

**श्रीरामनवमी**

श्रीरामनवमीचा सण आज पुणे आणि परिसरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. तुळशीबागेतल्या पेशवेकालीन श्रीराम मंदिरात आज श्रीरामजन्म सोहळा थाटात साजरा झाला. त्यानिमित्त मंदिराला फुलांची आकर्षक आरास आणि विद्युतरोषणाई करण्यात आली आहे. रामजन्मोत्सवानिमित्त अनेक धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. शहरात ठीकठिकाणी शोभायात्रा, मिरवणुका आणि रामकथा सोहळ्याचं आयोजनही करण्यात आलं आहे.

**सखी-गीतरामायण**

राम नवमीच्या पूर्वसंध्येला "सखी गीतरामायण आणि राम-सीता स्वयंवर" हा कार्यक्रम पुण्यात झाला; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**शपथ-दिन**

छत्रपती शिवाजी महाराजांनी १६४५ मध्ये चैत्र शुद्ध सप्तमीला मावळ्यांसह श्री क्षेत्र रायरेश्वर मंदिरात हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. या घटनेला भारतीय इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

२०२५ हे वर्ष 'हिंदवी स्वराज्याच्या शपथ दिनाचे'  ३८० वे वर्ष असून या निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत रायरेश्वर इथं विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलं होतं. रायरेश्वर ग्रामस्थ संस्था – रायरेश्वर, बायोस्फिअर्स, ग्रामपंचायत – रायरी, स्वराज्याभूमी प्रतिष्ठान, रायरेश्वर स्मारक समिती यांनी मावळातील सेवाभावी संस्था यांच्या सहकार्याने या उपक्रमांचं आयोजन केलं होतं.

**<u>कृत्रिम-बुद्धिमत्ता</u>**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही कोणत्याही प्रकारची स्पर्धा नसून , उलट त्या माध्यमातून चांगल्या प्रकारची प्रगती साध्य होऊ शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य लाभ घेण्यासाठी मानसिकतेमध्ये बदल करण्याची गरज असल्याचे मत महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनचे प्रमुख डॉ. विवेक सावंत यांनी व्यक्त केलं. पुण्यातील महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या  बिफोर चॅटजीपीटी टू एआय डिसरप्शन'   या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉक्टर सावंत बोलत होते.

**<u>हॅकेथॉन</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं येत्या ८ आणि ९ एप्रिल रोजी माहिती आणि तंत्रज्ञान विभागाच्या वतीनं ऑनलाईन पद्धतीनं हॅकेथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. महापालिकेच्या नूतनीकरण केलेल्या अधिकृत संकेतस्थळाचं येत्या १५ एप्रिल रोजी अनावरण करण्याचं नियोजन आहे.

**<u>माधुरी-मिसाळ</u>**

सुट्ट्यांच्या हंगामातील प्रचंड भाडेवाढीद्वारे खासगी बस मालकांकडून ग्राहकांची पिळवणूक टाळण्याबाबत पुणे  प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना योग्य सूचना द्याव्यात यासाठी भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर यांनी परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना निवेदन दिले होते. त्यावर मंत्री माधुरी मिसाळ यांनी कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

**राम-शिंदे**

लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाचा उपयोग सर्वसामान्य माणसाच्या समस्या सोडविण्यासाठी तसंच त्यांच्या आयुष्यात बदल घडविण्यासाठी करायला हवा, असं प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी केले. विधान परिषदेच्या सभापतिपदी निवड झाल्याबद्दल शिंदे यांचा नागरी सत्कार विधान परिषद आमदार योगेश टिळेकर यांच्या पुढाकारातून इस्कॉन मंदिर सभागृहात नुकताच आयोजित केला होता त्यावेळी ते बोलत होते.

**स्मशानभूमी**

देशभरातील स्मशानभूमींसाठी केंद्र सरकारतर्फे एक धोरण तयार करण्यात येत असून त्यासाठी पुणे महापालिकेतर्फे आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत अशी माहिती पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी दिली. नवी पेठ येथील वैकुंठ स्मशानभूमीत होत असलेल्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर तेथील नागरिकांनी पृथ्वीराज यांची भेट घेतल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

**ऊसगाळप**

राज्यात मार्च अखेरच्या ऊस गाळप हंगामाच्या अहवालानुसार, 80 लाख मेट्रिक टन साखर उत्पादन झालं आहे. एकूण 200 पैकी 189 कारखान्यांची धुराडी ऊस संपल्यानं बंद झाली असून सध्या केवळ 11 साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा साखर उत्पादनात 27 पूर्णांक 68 लाख मेट्रिक टन घट झाल्याचं स्पष्ट झालं आहे. साखरेचे 92 ते 104 लाख मेट्रिक टन उत्पादन हाती येण्याची अपेक्षा असल्याचं पुणे साखर आयुक्तालयाकडून सांगण्यात आलं आहे.

**बाजारभाव**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कोथिंबिरीच्या सव्वा लाख तर मेथीच्या पन्नास हजार जुड्यांची आवक झाली. गुढीपाडव्यानंतर फुलांच्या मागणीत घट झाली असून श्रीराम नवमीच्या पार्श्वभूमीवर पारंपारिक फुलांना मागणी असली तरी आवक वाढल्यानं भाव स्थिर आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र असून कमाल तापमान ४० तर किमान तापमान १७ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही आकाश निरभ्र राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**